(१२)

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १४] बुधवार, जून ३०, २०१०/आषाढ ९, शके १९३२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**—महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. .. | पृष्ठे १-३ |


**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१०.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2010.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.

**सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

१९९९ चा महा. १०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१० असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याचे कलम १४, पोट-कलम (७) मध्ये, "सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता" या मजकुराऐवजी "बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९९ चा महा. १०

## निवेदन

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (१९९९ चा महा. १०) याचे कलम १४ च्या पोट-कलम (७) मधील तरतुदींनुसार, त्यात नमूद केलेल्या परिस्थितीत, कुलपतीला, कोणत्याही योग्य अशा व्यक्तीची एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता कुलगुरू म्हणून काम करण्यासाठी नियुक्ती करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूचे पद यापूर्वीच रिक्त झाले आहे. कुलगुरूच्या पदाकरिता योग्य नावांची शिफारस करण्याकरिता समिती घटित करण्याच्या प्रक्रियेला जरी प्रारंभ झाला असला तरी ती प्रक्रिया उक्त कालावधीत पूर्ण होऊ शकली नाही म्हणून, महाराष्ट्र शासनाला, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम १४ यामध्ये योग्य त्या सुधारणा करून, कुलपतीला, उक्त सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीत वाढ करून, एकूण बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी कोणत्याही योग्य व्यक्तीची कुलगुरू म्हणून काम करण्यासाठी नियुक्ती करता यावी यासाठी योग्य त्या तरतुदी करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**के. शंकरनारायणन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक ३० जून २०१०.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मिलींद म्हैसकर,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNIROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.